# ABHIJAAT

## COEP'S OFFICIAL NEWSLETTER

## OCTOBER 2017

CHIEF EDITOR: AMBARISH PATKI
DESIGNER: SURADHA IYER

## सी. ओ. ई. पी.मध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

दरवर्षीप्रमाणे यंदाही स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सी. ओ. ई. पी. मध्ये ध्वजवंदन करण्यात आले.सकाळी ७.३० वाजता कार्यक्रमाची सुरुवात झाली. ध्वजवंदनाला महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. बी. बी. आहुजा सर तसेच जिमखाना उपाध्यक्ष डॉ. पी. आर. धामणगावकर सर आणि इतर मान्यवरदेखील उपस्थित होते. ध्वजवंदनाच्या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या साक्षीने राष्ट्रीय वारसा असलेल्या मुख्य इमारतीसमोर तिरंगा दिमाखात फडकवण्यात आला. त्यानंतर मा. पंतप्रधानांच्या निर्देशानुसार डॉ. धामणगावकर सरांनी स्वतःही शपथ घेतली व विद्यार्थ्यांनाही शपथ दिली.साधारणतः ९.०० वाजता ध्वजवंदनाचा सोहळा संपन्न झाला.

पियुष गिरगांवकर, अंबरीश अ. पत्की

## यू. पी. एस. सी. गुणवंतांचा सत्कार


दरवर्षी शासकीय अधिकाऱ्यांच्या निवडीसाठी राष्ट्रीय पातळीवर केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा म्हणजेच UPSC CSE ही परीक्षा घेतली जाते.2016 ला झालेल्या UPSC परीक्षेत COEP च्या तब्बल 16 विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश मिळवले. COEP च्या शिरपेचात मानाचा तुरा रोवलेल्या या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा दि.3 ऑगस्ट 2017 रोजी main Auditorium मध्ये पार पडला.

Alumni Association of COEP आणि Civil Services Aspirants Club ने आयोजित केलेल्या या सोहळ्यास महाराष्ट्र शासनाचे माजी मुख्य सचिव श्री. अजित निंबाळकर(IAS),श्री. महेश भागवत(IPS, CP, राचाकोंडा),श्री.श्रावण हार्डीकर (IAS,आयुक्त PCMC) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.तिन्ही उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे उत्तम मार्गदर्शन केले विश्वांजली गायकवाड (AIR 11),दिनेश गुरव (AIR 160),किरण खरे (AIR 221),आकाश यादव (AIR 346),महेश चौधरी (AIR 423),संतोष सुखदेवे (AIR 546),शुभम ठाकरे (AIR 686),रोहन घुगे (AIR 736),धीरज मोरे (AIR 756),सारंग फोफळे (AIR 892),मनोज महाजन (AIR 903),राहुल रायसिंग(AIR 947),सुमित कुमठे (AIR 962),शिवम धामणिकर (AIR 968),धम्मपाल खंडागळे (AIR 1020),प्रीतम तुरेराव (AIR 1033) या सर्व सत्कारमूर्तींनी सोहळ्याच्या उत्तरार्धात विद्यार्थ्यांचे शंकानिरसन केले.COEP कडून या सर्व गुणवंतांना त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा.

वैष्णवी हर्डीकर



## COEP TALES





Manas Joshi

## Seminar on Higher Education in the US

Pursuing higher education in the US has become a great deal of confusion since the recent announcement of changes in Visa Policy. To ease into the fears of Parents and Students, Endeavour organised a seminar in E-Cell on the changes brought in by Trump Government. Mr Vipul Tyagi from IIM-A was the guest speaker. He discussed the changes that are going to be taken into the effect and cleared students' doubts. He also provided info on booming sectors to choose right after engineering. Tips on managing profiles and scholarships while studying in India and abroad were also given. More than 100 students attended 1 hr seminar. It was an enriching experience for the students thinking of going abroad for higher education.

- Abdul Malik

## COEP TALES




Ankush Shende

# ABHIJAAT EDITION X

## SPIC MACAY : कलाकारासोबत एक संध्याकाळ

SPIC MACAY अर्थातच 'Society for the Promotion of Indian Classical Music And Culture Amongst Youth' यांच्यातर्फे 'क्लब उद्घाटन समारंभ आणि एक संध्याकाळ कलाकारासोबत' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास तरुण पिढीतील प्रसिद्ध शास्त्रीय संगीतकार आणि गायक श्री. पुष्कर लेले प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. त्याचप्रमाणे Club faculty advisor प्रा. नीलिमा पाटील मॅडम आणि प्रा. जे. ए. खेर सर देखील उपस्थित होते. C O E P च्या विद्यार्थ्यांबरोबरच I I S E R पुणे येथील विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमास हजेरी लावली. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने आणि सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर क्लबमधील विद्यार्थ्यांनी तबला ववायोलिनच्या साथीने सुरेख सादरीकरण केले. SPIC MACAY ची थोडक्यात ओळख आणि वर्षभरात होणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती एका प्रेझेंटेशनद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात आली. शास्त्रीय संगीताबाबत घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषेने कार्यक्रमात रंगत आणली. त्यानंतर श्री. पुष्कर लेले यांनी संगीताचे विविध प्रकार आणि भारतीय शास्त्रीय संगीत याबद्दल माहिती दिली. त्याचप्रमाणे एक कलाकार म्हणून शास्त्रीय संगीताप्रती असलेला दृष्टीकोन आणि त्यांचे विविध अनुभव त्यांनी श्रोत्यांसमोर मांडले. मान्यवर व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

-मंदार भानुवंशे

## महाविद्यालयीन निवडणुका 2017

प्रतीवर्षीप्रमाणेच यंदादेखील सी ओ ई पी मध्ये २२ ऑगस्ट रोजी निवडणुका पार पडल्या. जिमखाना सचिव व स्नेहसंमेलन सचिव या पदांसाठी अनुक्रमे विद्यार्थीनी व विद्यार्थी असे आरक्षण होते. निवडणुकीसाठी प्रतीवर्षीप्रमाणेच रोबोट स्टडी सर्कल ने एक आधुनिक ई व्ही एम् बनवले होते. निवडणुकीच्या दिवशी द्वितीय वर्षासाठी रूम नं. ७, तृतीय वर्षासाठी रूम नं.६ ,अंतिम वर्षासाठी सेमीनार हॉल १ व एम टेक द्वितीय वर्षासाठी ऑडीटोरीयम येथे मतदानाची व्यवस्था करण्यात आली होती. मतदानासाठी ओळखपत्र असणे बंधनकारक करण्यात आले होते. सर्व ठिकाणी अतिशय कडक बंदोबस्तात मतदान पार पडले. अनुचित प्रकार रेकॉर्ड करण्यासाठी वीडियो शूटिंग करण्यात आले. कैक प्राध्यापक व आर एस सी चे स्वयंसेवक व् सेक्यूरिटी गार्ड्स यांच्या संयोजनाने मतदान सुरळीत पार पडले.

शाब्दिक फेकाफेकी वगळता कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. तत्पूर्वी, जिमखाना सचिवपदासाठी ऋतुजा बजागा, अभिजात शिवानी भडांगे, शिवानी तिडके यांच्यात तिरंगी लढत रंगली. तसेच स्नेहसंमेलन सचिव पदासाठी मयूर गिरासे, तेजेश सावरकर व प्रांजल चोपडे यांच्यातदेखील अटीतटीची लढत रंगली. संध्याकाळी ६ वाजता मतमोजणी नंतर निकाल जाहीर करण्यात आले. यात जिमखाना सचिव म्हणून ऋतुजा बजागा तर स्नेहसंमेलन सचिव म्हणून तेजेश सावरकर यांचा विजय झाला. निकाल जाहीर झाल्यानंतर वसतिगृह आवारात जल्लोष करण्यात आला. यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. विजयी उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन व् पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा .

-

पीयूष गिरगांवकर.


## MINDSPARK'17 INAUGURATION

The most awaited and anticipated technical fest of COEP, MindSpark heralded its way this year starting with the inauguration ceremony on the stimulating evening of 8th August 2017. The ceremony was attended by various faculties and students alike. The ceremony commenced late in the evening. Our director, Dr. B.B Ahuja, Dean-Student Affairs Dr. S.L. Patil, Gymkhana V P Dr. P.R.Dhamangaonkar Sir, along with the faculty advisors of various portfolios were some of the dignitaries present at the captivating ceremony. The dignitaries also conveyed their compliments and appreciation to the core team members and voiced their expectations for this year.The team then presented a video about the ex-core team where they briefed their work during Mindspark'16. It was a hindsight into the core-team family. A video of the current team working was also displayed giving the workaholic atmosphere a rather homely feeling. The core team members then introduced themselves along with the accomplishments of their portfolios. The championship trophy was also presented in all its glory. Various events like Pune's largest student organised hackathon, new workshops under Paakhi, the first technical exhibition of startups were introduced, inducing a lively spirit among the students. The 11th edition of Mindspark now encompasses 50+ events and countless workshops promising the academia to keep them on their toes .

-Sudharshini Omprakash








Darshana Patil

## ABHIJAAT EDITION X

### स्पंदनची झेप : 'सोशल टू टेक्नोसोशल'

विद्यार्थीदशेमध्ये असतानासुध्दा सामाजिकता कशी जपावी याचे आदर्श उदाहरण असणारा 'स्पंदन' आजच्या तांत्रिकतेच्या युगामध्ये दोन पावले पुढे टाकत आहे. १७ ऑगस्ट २०१७ रोजी स्पंदनकडून 'ग्रामसर्वेक्षण' करण्यात आले. त्यासाठी 'ठिकेकरवाडी' या स्वयंपूर्ण गावाची निवड करण्यात आली. या गावामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सुविधा बघून प्रभावित झालेल्या स्पंदनच्या सदस्यांनी ठिकेकरवाडीचे सरपंच मा. संतोष ठिकेकर यांना प्रमुख अतिथी म्हणून पाचारण केले होते. २३ ऑगस्ट २०१७ रोजी स्पंदनने स्वागतपर समारोह आयोजित केला होता ज्यामध्ये 'स्पंदन'कडून दरवर्षी सामाजिक भान जपण्यासाठी घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. रक्षाबंधन व गणपती विसर्जन आणि ग्रामशिबीर तसेच रक्तदान शिबीर यांचीही माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला सी.ओ.ई. पी.च्या विद्यार्थी विभागाचे अधिष्ठाता डॉ.एस.एल.पाटील सर आणि स्पंदनचे मार्गदर्शक रांजेकर सरदेखील उपस्थित होते. यावेळी दीपप्रज्वलनानंतर मा.पाटील सरांनी मा. संतोष ठिकेकर यांचे स्वागत केले तसेच मा.रांजेकर सरांचे स्वागत 'स्पंदन'तर्फे कु.सायली धिंगे हिच्याकडून करण्यात आले. नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की 'पर्यावरण जपा' असा संदेश जपलेल्या 'स्पंदन'ने भेट म्हणूनसुध्दा पर्यावरणपूरक रोपटे दिले व अप्रत्यक्षपणे झाडे लावा झाडे जगवा' चा नारा दिला. नंतर झालेल्या भाषणामध्ये मा. ठिकेकर सरांनी त्यांच्या गावामध्ये केलेल्या तांत्रिक विकासाबद्दल भाष्य केले आणि एक उत्कृष्ट अभियंता म्हणून सी.ओ.ई.पी. च्या विदयार्थ्यांकडून सहकार्याची अपेक्षाही केली. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. तंत्रज्ञाम्पलान कौशल्य आणि सामाजिकतेचा संगम साधून सत्यार्थाने समाजाची प्रगती करणारा स्पंदन असेच कार्य करत राहो याच शुभेच्छा.

अंबरीश अविनाश पत्की

## जाणीवतर्फे कार्यक्रमाचे आयोजन

समाजातील विविधअंगी प्रश्न विचारात घेऊन, त्यावर चर्चा करून,ते प्रश्न सोडवण्यासाठी काम करणाऱ्या जाणीव क्लब तर्फे दिनांक ८ ऑगस्ट,मंगळवार रोजी खेळीमेळीच्या वातावरणात विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा यासाठी 'fun with hands on science' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांमध्ये विज्ञान विषयाची गोडी निर्माण करण्यासाठी पुण्यातील 'आयुका' मध्ये काम करणारे अरविंद गुप्ता यांचे सहकारी डॉ.अशोक रुपनेर यांनी या कार्यक्रमाची धुरा सांभाळली.सध्या अशोक सर पुण्यातील IISER मध्ये विज्ञान कार्यक्रम विभाग आणि विज्ञान व गणित विशेष शिक्षण विभागाचे कार्यकारी व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहेत.सरांनी सहज उपलब्ध होणाऱ्या काही वस्तूंपासुन विज्ञानातील मूलभूत संकल्पना सांगणारे बरेच प्रकल्प बनवले होते आणि त्याचे प्रात्यक्षिक प्रेक्षकांना पहाण्याची संधी मिळाली.विज्ञानातील संकल्पनांचा प्रसार करून समाजात घडणाऱ्या अंधश्रद्धा दूर करण्याबाबतही सरांचे मार्गदर्शन या वेळी लाभले.या वेळी विज्ञान रॅलीला उपस्थित राहण्याचे आवाहनही करण्यात आले.अश्या रीतीने विद्यार्थ्यांच्या उदंड प्रतिसादात या कार्यक्रमाची एका मजेदार ध्वनीचित्रफीतने सांगता झाली.

आदित्य वाळुंज

## Debate Club Achievements

The awaited Debate and Quiz club orientation took place on Monday, 21 st of August at 6pm in Mini Auditorium. The orientation was common for all the three sections namely, English, Marathi and Quiz section. Over 40 people attended the orientation. They were introduced with the club activities like COEPMUN and Visvesvarayya Memorial Debate and many other competitions which gave an idea of what is expected from the future members. Moreover, a mock debate with a dummy motion was conducted towards the end with the audience divided into groups where they were guided and corrected with their arguments. The first peek of the induction topics with the format was released at the end of the session. The orientation in all acted as a -boost for inductions which witnessed an overwhelming turnout.

Continuing to make the college proud with its innumerable accolades, the COEP debate club team of Divij Ghose, Dhananjay Jagtap and Ravina More won the Pune round of Sweden India Nobel Memorial Quiz, organised annually by the Embassy of Sweden. They will now move forward to the nationals to be held in Delhi on 11 th of October. The winner in the nationals will be awarded with a paid trip to Sweden.

Harsha Sinha

## SWF द्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन

SWF अर्थात Student Welfare Forum द्वारे वर्षाच्या सुरुवातीलाच दोन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम उदघाटन आणि प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर STEP UP या सत्राचे आयोजन दि ९ ऑगस्ट रोजी मिनी ऑडिटोरियम मध्ये करण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून UPSC CSE मध्ये उत्तुंग यश प्राप्त केलेले विद्यार्थी कु.विश्वांजली गायकवाड तसेच राहुल खंडारे, यू.पी.एस.सी. अकॅडेमिया चे संस्थापक हे लाभले होते. तसेच जिमखाना उपाध्यक्ष प्रा.डॉ. पी आर धामणगावकर व विद्यार्थी उपक्रम अधिष्ठाता प्रा.डॉ. एस एल पाटील हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध शिष्यवृत्त्यांबाबत माहिती देण्यात आली. तसेच शैक्षणिक व अतिरिक्त उपक्रमांबाबत जागृत करण्यात आले. कु.विश्वांजली गायकवाड यांनी आपल्या भाषणात नमूद केले की COEP हे आपल्या स्वप्नांचा पाठलाग करण्याचे व्यासपीठ आहे. राहुल खंडारे यांनी विद्यार्थ्यांना संदेश दिला की COEP मध्ये प्रवेश मिळणे ही यशाची फक्त पहिली पायरी असून येथूनच खरा प्रवास सुरु होतो.

हिंसेला नकार मानवतेला स्वीकार हा दुसरा कार्यक्रम दि १८ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे दिवंगत संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या कन्या तसेच सामाजिक कार्यकर्त्या मुक्ता दाभोळकर यांनी प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थिती लावली. त्यांनी नरेंद्र दाभोळकरांचे कार्य समजावून सांगितले. त्यांनी नमूद केले की, दाभोळकरांनी जुन्या रूढी परंपरा ऐवजी नव्या वैज्ञानिक जगात जगण्याचा संदेश दिला पण त्यांचे हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेण्यासाठी हिंसेचा वापर केला गेला. पण माणूस मेला म्हणून त्याचे विचार मरत नसतात. त्यामुळे आजही दाभोळकरांचे कार्य तसेच चालू राहील असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले.

लोकेश पाटील

# COEP TALES




Ankush Shende

# GRE Workshop

Educational Testing Services conducted a workshop on GRE in Auditorium. Over 650 Students turned up for the session having crucial information on GRE. They were given tips to ace the exam, no. of times it can be taken and how to prepare etc. General doubts were also cleared. The Workshop was full of fun along with Informative Session.

Fun quizzes were conducted to test the General Knowledge of Students. Bluetooth speakers and Headphones were some of the goodies given away to the winners. It was a pleasant experience for the students to get all the required information.along with fun activities.

- Abdul Malik

# ABHIJAAT EDITION X

## Victory of Street Play Team in Malhar


13 th of August is globally celebrated as the "World Organ Donation Day". There can't be a better occasion for performing an impactful and sensitizing street play about organtransplantation and trafficking. A team of 10 artists from the Mad-ads and Street Play club of CoEP performed in "Malhar", the popular cultural fest of St. Xavier's college, Mumbai and impressively bagged the 2 nd prize. It was a 12 minute thrilling drama piece titled "Azaadi" that focused not only on the benefits of organ transplantation but also on the ill- effects of ruthless malpractices such as organ trafficking, bonded labour and prostitution. More importantly, it imparted solutions to stand up against these crimes to the victims as well as the coerced participants. Women were informed about the provisions provided by the government such as the special toll-free helpline number service. They were also familiarised with the procedure and imperative details that they must know for filing a complaint against such crimes. The play received a special applause from the jury and the audience especially because of the humour with which it was delivered.

Srirang Sohoni

# COEP's Remarkable performance at Pune, Walk smart 2017

Pune Municipal Corporation had arranged 'The Walk Smart' competition for revitalization of subways and foot over bridges in Pune city. The aim of the competition is to provide ideas and plans which can be used to promote the use of the existing facilities. Participant teams are expected to select a group of subways and foot over bridges and come up with critical analysis of the issue andsustainable solutions to tackle the issues.
Students of COEP (TY. Btech, planning) , Sakshi Dark ,Shraddha Kulkarni , Nihar Thombare, Shivanand Nalgire , Snehal Kanade , Shivangi Aundhekar and Shubham Phulgirkar had selected the theme Green Wheels . They come up with the user analysis and related issues of Shaniwarwada subway, Nal stop subway, G. M. Bhosle subway and Sarasbaug Fob. The team come up with framework of sustainable solutions for subways and Fobs. The components of revitalization of subway and foot over bridge namely, Speaking Walls, Universal accessibility, security and pedestrian safety were used to address the problem holistically. These concepts was presented in the form of brief report named "GREEN WHEELS; WHERE EVERY TRIP IS RECREATIONAL". The team secured second position in the competition and was awarded with cash prize of twenty thousand rupees. Also another team from TY.Btech planning, Gauri Gawande and team secured third rank in the competition and was awarded with 15,000 rupees.
Ceremony of this competition was held on 31 st July, 2017 at Mayor's office in Pune MunicipalCorporation in presence of Mukta Tilak, the honourable Mayer of PMC along with several guestsworking in planning field.

Devyani Rajgure



**ABHIJAAT FAMILY WISHES ITS READERS A SAFE, PROSPEROUS & ECO FRIENDLY DIWALI!**